E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 5.675

# AKSHARA

## MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B)

# Humanities & Indian Knowledge System




**Guest Editor**
Prof.Dr. S. V. Patil
Act. Principal
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Comm.College, Bhusawal

**Executive Editor**
Dr. A. D. Goswami
Vice-Principal & Head, Dept. of Economics

**Executive Editor**
Prof. Dr. B. H. Barhate
Vice-Principal

**Associate Editor**
Prof. Dr. Prafull Ingole
Head, Department of History

**Associate Editor**
Prof. Dr. Sachin Rajput
Department of Philosophy

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Comm. College, Bhusawal

Chief Editor : Dr. Girish S. Koli
Akshara Publication

Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal

Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

March 2024 Special Issue 11 Volume II (B) SJIF Impact- 5.67

# Index


| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 1 | Portrayal of Nature in John Steinbeck's novels | Dr. B. N. Kesur<br>Dipak Namdeo Patil | 05 |
| 2 | पशुपालन आणि भारतीय ज्ञान पद्धती | प्रा.डॉ.ए.डी.गोस्वामी<br>श्री. अमोल श्रावण बावस्कर | 10 |
| 3 | आयुर्वेद : एक भारतीय चिकित्सा पद्धतीचा महान वारसा | डॉ. प्राची पाटील | 15 |
| 4 | मराठी संप्रदाय आणि भारतीय ज्ञान परंपरा | डॉ.दीनानाथ रघुनाथ पाठक<br>प्रो.किशोर रघुनाथ पाठक | 17 |
| 5 | Varkari Sampradaya: An all Inclusive Sect of Bhakti Sampradaya | Dr. Kiran Save<br>Kirti N. Mardikar | 21 |
| 6 | लोकशाहीत जबाबदार नागरिकत्वाची आवश्यकता : एक विश्लेषणात्मक अभ्यास | स्वप्नील भास्कर पालवे<br>प्रा.डॉ.शुभांगी डी. राठी | 24 |
| 7 | भारतीय ज्ञान परंपरेतील आंबेडकरी काव्य आणि मानवतावाद | प्रा. खिवैया काळू अहिरे | 27 |
| 8 | भारतीय साहित्य ज्ञानपध्दती में हिंदी साहित्य की नवगीत विधा | डॉ. जगदीश बन्सीलाल चव्हाण | 30 |
| 9 | भारतीय ज्ञानपध्दती में हिंदी ग़ज़ल विधा का योगदान | प्रा. डॉ. मनोज एन. पाटील | 34 |
| 10 | शिवाजी महाराजांच्या साम्राज्यातील आरमार आणि लष्करी व व्यवस्थेचा तुलनात्मक चिकित्सक अभ्यास | डॉ. लक्ष्मण पोपटराव वाघ | 38 |
| 11 | भारतीय अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक सत्तेचा खर्च विषयक बदलता दृष्टिकोन | प्रा.सुनिल दशरथ अडकमोल<br>प्रा. डॉ. विनोद आत्माराम नन्नवरे | 40 |
| 12 | भारतीय ज्ञान पध्दती में हिंदी उपन्यास साहित्य का योगदान 'प्रेमचंद के विशेष संदर्भ में' | डॉ. हुकूमचंद शंकर जाधव | 43 |
| 13 | The Embodiment of True Gentility in Dickens' *Great Expectations.* | Bhalerao Vaibhav Sunil | 46 |
| 14 | प्राचीन मराठी जैन साहित्यातील भारतीय ज्ञान परंपरा | डॉ.पुरुषोत्तम प्रल्हाद महाजन | 48 |
| 15 | भारतीय ज्ञान परंपरा में हिंदी ग़ज़लों का योगदान | प्रा. डॉ. रविंद्र रामदास खरे | 51 |
| 16 | भारतीय ज्ञान परंपरा में कबीर की भक्ति | डॉ. कृष्ण बिहारी रॉय | 55 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला स्वातंत्र्या विषयी विचार | डॉ.राजेंद्र नाडेकर | 57 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनातून - स्त्रीविषयक भारतीय ज्ञानपद्धती | प्रा. व्ही.ए. सोळुंके<br>डॉ. विनोद नन्नवरे | 60 |
| 19 | Effects of occupational disease on the Indian Railway Employees of India Streme : Commerce & Management | Prof. Smita N.Bendale<br>Prof.Dr.A.I.Bhangale | 63 |
| 20 | Comparative Study of Online and Offline Home Loan Application System with special reference to Jalgaon District | Jayashree A. Chaudhari<br>Dr. Harish Purohit | 67 |
| 21 | लोकसाहित्य आणि ज्ञानपद्धती | प्रा.वंदना रमेश महाजन | 71 |
| 22 | मध्ययुगीन मराठी संतांची शिकवण | डॉ. दिपक दिनकर किनगे | 74 |




Scanned with OKEN Scanner

Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B) SJIF Impact- 5.67

11

# भारतीय अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक सत्तेचा खर्च विषयक बदलता दृष्टिकोन

**प्रा. डॉ. विनोद आत्माराम नन्नवरे**
मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय जळगाव

**प्रा.सुनिल दशरथ अडकमोल**
संशोधक विद्यार्थी
भुसावळ कला ,विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा
वाणिज्य महाविद्यालय , भुसावळ.

---

**प्रस्तावना -**

अर्थशास्त्र हा सर्वसामान्यांच्या परिचयाचा आणि दैनंदिन जीवन जगत असतांना येणाऱ्या विविध अनुभवातून शिकण्याचा विषय आहे. सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत व्यक्ती ज्याकाही आर्थिक क्रिया करत असतो. त्या सर्वच्या सर्व क्रिया अर्थशास्त्राशी निगडित असतात. दैनंदिन जीवनाचा अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र आहे. असे देखील म्हटले जाते. त्यामुळे अर्थशास्त्राचे विचार सनातन वाद्यांनी माडतांना असे मत व्यक्त केले की, अर्थव्यवस्थेत सरकारने हस्तक्षेप करू नये. म्हणजेच अर्थव्यवस्था हि निर्हस्तक्षेपी असावी. असे म्हटले म्हणजेच सार्वजनिक सत्तेने उत्पादन कार्यात हस्तक्षेप करू नये. असे केल्यास अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होऊ शकतो. असे मत सनातनवाद्यांनी मांडलेले दिसून येते आणि जे काही उत्पादन होईल त्याला मागणी निर्माण होते असे म्हटलेले दिसून येते. तर आधुनिक आधुनिक अर्थतज्ज्ञांनी मांडलेले विचार हे पुर्ण पणे विरुद्ध असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने अर्थशास्त्र हे ही अशी ज्ञानशाखा आहे की, ज्या ज्ञानशाखेत सातत्याने अनेक विविध बदल हे होत असल्याचे आपल्याला दिसून येतात. आणि त्याचाच एक भाग म्हणून सनातनवाद्यांचे मत 1929 ते 1932 च्या महामंदी काळात सनातनी विचार मागे पडले. परिणामी सनातनवाद्यांचे विचार याप्रसंगी पूर्णतः फोल ठरले. म्हणजेच याचाच अर्थ सरकारने हस्तक्षेप केला नाही तर अर्थव्यवस्था मंदीच्या दुष्ट चक्रात अडकू शकते आणि त्याचे दीर्घकाळ परिणाम अर्थव्यवस्थेला भोगावे लागतात. हे यातून दिसून आले आणि जागतिक महामंदी नंतर एका नवीन अर्थशास्त्रीय विचारांचा जन्म झाला. ते विचार मांडण्याचे श्रेय 1936 मध्ये जे. एम. केन्स यांनी आपल्या 'जनरल थिअरी एम्प्लॉयमेंट इंटरेस्ट अँड मनी' या ग्रंथातून मांडलेले आपल्याला दिसून येतात. त्यात केन्स यांनी सनातन वाद्यांच्या विचारांपेक्षा पूर्णतः भिन्न विचार मांडलेले दिसून येतात. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की पूर्ण रोजगार प्रस्तापित होण्यासाठी सरकारने हस्तक्षेप केला पाहिजे. त्याच बरोबर अल्पकाळ विचारात घेतला. तसेच सार्वजनिक उत्पन्न सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज या संकल्पनांना महत्त्व प्राप्त झाले. आणि यानंतर सरकारने सार्वजनिक कल्याण वाढ करण्यासाठी जास्तीत जास्त खर्च केला पाहिजे. आणि त्या पद्धतीने उत्पन्नाचे मार्ग निर्माण करायला पाहिजे असा विचार निर्माण झाला.

**उद्दिष्टे -**

1. सार्वजनिक खर्चातील सातत्याने होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.

**गृहितके -**

1. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सार्वजनिक खर्चात सातत्याने बदल होत आहे.
2. सार्वजनिक खर्चात वाढ होणे हे आर्थिक विकासाचे लक्षण आहे.

**संशोधन पद्धती -**

सदर विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेतला आहे.यात प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ ,वर्तमान पत्र,विविध मासिक ,साप्ताहिक ,संशोधन पेपर ,इंटरनेट यांच्या सहाय्याने अध्ययन केले जाणार आहे.

प्राचीन काळापासून आतापर्यंत राज्याचे कार्यक्षेत्र सारखे बदलत जाऊन अधिकाधिक व्यापक झाल्याचे आढळून येते. अंतर्गत सुरक्षितता राखणे, परचक्रापासून रक्षण करणे व समाजातील सर्व घटकांना एकत्रित ठेवणारी व्यवस्था निर्मिणे ही राज्याची विशिष्ट कार्ये ठरली. नागरिकांना परस्परांशी शिष्टसंमत संबंध ठेवून जीवन व्यतीत करता येईल, नागरिकांचे हक्क व कर्तव्ये स्पष्ट होतील, अशा प्रकारची व राजकीय सत्तेच्या मर्यादा स्पष्ट करणारी अशी शासनव्यवस्था, व्यवस्था पाहिजे म्हणून नव्हे, तर समाजाच्या रक्षणासाठी, जतनासाठी आणि विकासासाठी निर्माण करावी लागते. तिचे स्वरूप राज्याच्या ध्येयावर अवलंबून असते.

राज्याला फक्त रक्षक-राज्य असून भागत नाही. समाजाच्या न्यायाच्या व स्वातंत्र्याच्या अपेक्षा पूर्ण करणारी व्यवस्था निर्मिणे हे राज्याचे कर्तव्य असते. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत दुर्बळांचे प्रबळांपासून रक्षण, हा आजचा संरक्षणाचा अर्थ असल्यामुळे राज्याचे कार्यक्षेत्र व्यापक बनले आहे. सर्वांना किमान जीवनमान प्राप्त करून देणे, हा संरक्षणाचा एक (भाग) प्रकार होय. यातूनच जास्त व्यापक दृष्टिकोण निर्माण होतो. तो जतनाचा व वर्धनाचा म्हणजे विकासाचा. जीवन सुरक्षिततेने जगता येईल अशा व्यवस्थेनंतर



Scanned with OKEN Scanner
Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
March 2024 Special Issue 11 Volume II (B) SJIF Impact- 5.67

जीवन चांगल्या रीतीने जगण्याची व्यवस्था करणे राज्याचे कर्तव्य ठरते. मानवी शक्तीचा व नैसर्गिक संपत्तीचा जतनाच्या आणि विकासाच्या दृष्टीने विचार करून प्रगतीची वाटचाल करणे राज्याचे कर्तव्य असते. याचा अर्थ राज्याला कल्याणकारी राज्य बनावे लागते. कल्याणात आर्थिक सुस्थिती आणि सुबत्ता, मानसिक व नैतिक मूल्यांची जोपासना, सभ्यतेविषयी आदर व सभ्येतीच विशिष्ट पद्धती यांचा समावेश होतो. त्यासाठी भौतिक साधनांच्या योग्य विभाजनाची, किमान जीवनमानाची व त्या पलीकडे जाऊन स्वतःच्या गुणवत्तेने प्रगती करण्याची संधी प्रत्येकाला मिळवून देण्याची जबाबदारी राज्यावर असते. त्यामुळे आर्थिक व्यवस्थेत हस्तक्षेप करावा लागतो. असा हस्तक्षेप, आर्थिक व्यवहार चालविण्यासाठी नसून, सामाजिक मूल्ये संरक्षिण्यासाठी, शोषणमुक्तीसाठी, अन्याय दूर करण्यासाठी, स्वार्थी आर्थिक हेतूंना पायबंद घालण्यासाठी असतो. पूर्वापार चालत आलेल्या कार्याबरोबर समाजकल्याणाची जबाबदारी स्वीकारल्यामुळे राज्याला, अर्थव्यवस्थेचे नियंत्रण व अनुषंगाने इतर क्षेत्रांचे नियंत्रण करावे

**सार्वजनिक खर्च -** सार्वजनिक खर्च म्हणजे सार्वजनिक सत्तेने केलेला खर्च होय. भारतामध्ये त्रिस्तरीय शासन पद्धती अस्तित्वात आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था.

**सनातनवादी दृष्टीकोन -** सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञ अडम स्मिथ च्या मते सरकारचे धोरण निर्हस्तक्षेपाचे असावे.सरकारने अर्थव्यवस्थेत कमीत कमी हस्तक्षेप करावा.देशाचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे ,देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे ,पोलीस आणि न्याय व्यवस्था निर्माण करणे ,समाज हितासाठी आवश्यक वस्तू व सेवांचे उतादन करणे याकार्याव्यतिरिक्त सरकारने हस्तक्षेप करू नये . भांडवलशाही अर्थव्यवस्थेत यामुळे दारिद्र्य ,बेरोजगारी आर्थिक विषमता यासारख्या समस्या निर्माण झाल्या.

सार्वजनिक सत्तेने कायदा व सुव्यवस्था ,संरक्षण व काही सामाजिक गरजा यावरच खर्च करावा असे सनातनवादीयांचे मत होते.19 व्या शतकाच्या सुरुवातीला केवळ संरक्षण आणि कायदा व सुव्यवस्था एवढीच सरकारची जबाबदारी होती , त्यामुळे सुरुवातीच्या काळात सरकारचा खर्च हा कमी प्रमाणात होता. सरकारने कमीत कमी कार्य करावे .सरकारचे अंदाजपत्रक समतोलाचे असावे असे ते मानत.सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ सार्वजनिक खर्चाला उत्पादक खर्च आणि अनुत्पादक खर्च मानतात.

**आधुनिक दृष्टीकोन -** 1929 च्या जागतिक महामंदी नंतर भारत सरकारने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचे धोरण स्वीकारले. केन्स यांनी सनातन वाद्यांच्या विचारांपेक्षा पूर्णतः भिन्न विचार मांडलेले दिसून येतात. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की पूर्ण रोजगार प्रस्तापित होण्यासाठी सरकारने हस्तक्षेप केला पाहिजे.केन्सच्या मते सरकारने व्यापार चक्राचे निर्मुलन करण्यासाठी सरकारने कर ,खर्च आणि कर्ज या साधनांचा वापर करावा.सरकारने तेजीच्या काळात सार्वजनिक खर्चात कपात करावी आणि मंदीच्या काळात सार्वजनिक खर्चात वाढ करावी.

सरकारने कल्याणकारी राज्य संकल्पनेचा स्वीकार केला.कल्याणकारी राज्य निर्मितीसाठी सरकारने आपल्या कार्याचा विस्तार केला. देशाचे संरक्षण ,कायदा व सुव्यवस्था याकार्या बरोबरच रस्ते ,रेल्वे ,विमानतळ ,धरणे ,पुल, सार्वजनिक दवाखाने ,शाळा ,महाविद्यालय ,पिण्याचे पाणी ,स्वच्छता ,माहिती तंत्रज्ञान , निवृत्तीवेतन, पायाभूत सुविधा सामाजिक कल्याणकारी योजना यासारख्या विकासात्मक कार्ये सरकार करू लागले. भारतामध्ये नियोजन आयोगाच्या माध्यमातून पंचवार्षिक योजनांद्वारे विविध कल्याणकारी योजनांचा स्वीकार करण्यात आला त्यामुळे अर्थव्यवस्थेत सतत विकास होत गेला तसतसा सरकारच्या खर्चात वाढ होत गेली.अर्थव्यवस्थेचा विकास आणि सार्वजनिक खर्च यांचा जवळचा संबंध असतो असे मत वगनार या शास्त्रज्ञाने मांडले.

भारतात सार्वजनिक खर्चाचे महसुली खर्च आणि भांडवली खर्च अशा दोन भागात वर्गीकरण केले जाते. महसुली खर्चात दैनंदिन प्रशासन, सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था इत्यादीवर होणारा खर्च समाविष्ट असतो, हा खर्च नियमित केला जात असून त्यात दरवर्षी वाढ होत आहे. देशाची सुरक्षा, नागरी सेवा, राज्य सरकारी व स्थानिक सरकार यांना देण्यात येणारे आर्थिक सहाय्य, व्याजदराची परतफेड, कर महसूल आकारणीचा खर्च, सामाजिक सेवा आणि सुविधांवरील खर्च इत्यादी कारणामुळे भारताच्या महसुली खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. भांडवली खर्च- अर्थव्यवस्थेमध्ये भांडवली वस्तूंच्या निर्मितीसाठी केला जाणारा खर्च सरकारकडून मोठमोठ्या प्रकल्पांच्या उभारणीसाठी रस्ते बांधणे, धरण बांधणे, शैक्षणिक संशोधक संस्था उभारणीसाठी, मोठमोठे यंत्रे आणि संयंत्रे यावर भांडवली खर्च केला जात असतो.

आधुनिक अर्थशास्त्रज्ञ याला विकासात्मक खर्च म्हणतात ज्या खर्चामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभार लागतो तो विकासात्मक खर्च. उदाहरणार्थ- जलसिंचन प्रकल्प, वाहतूक व दळणवळण, पायाभूत सुविधा निर्मिती याबरोबरच शिक्षण आणि आरोग्य यांच्यावर होणारा खर्च हा विकासात्मक खर्च आहे याउलट सामान्य प्रशासन, पोलीस व्यवस्था, न्यायव्यवस्था, कर्जावरील व्याज इत्यादी खर्च हा अविकासात्मक खर्चात मोडला जातो. भारतात पंचवार्षिक योजनांद्वारे सार्वजनिक खर्च करण्यासाठी नियोजन



Scanned with OKEN Scanner
Scanned with CamScanner

आयोगाची स्थापना करण्यात आली होती पंचवार्षिक योजनांद्वारे सरकारच्या खर्चात वाढ दिसून येत आहे. योजना खर्चा प्रमाणे सरकारचा योजना बाह्य खर्चातही वाढ होत आहे.

**सार्वजनिक खर्चाचा आकार आणि वृद्धी -**

भारतात केंद्र सरकार ,राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था या तिन्ही सरकारांच्या जबाबदार्या नुसार पार पडताना होणार्या खर्चाचा समावेश केला आहे .१९९१ मध्ये भारताने आर्थिक सुधारणांचा स्वीकार केला .जागतिकीकरण ,खाजगीकरण आणि उदारीकरण घोरण स्वीकारल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योगांचे खाजगीकरण करण्यास सुरुवात केली असे असले तरी सामाजिक कल्याणाच्या विविध योजना ,रोजगारनिर्मितीचे कार्यक्रम मुलभूत गरजांची पूर्तता ,वाढती महागाई या अनेक कारणामुळे सरकारच्या खर्चात वाढ होत आहे .अंदाजपत्रकात तुटीचा अर्थभरणा करून हा खर्च सरकारला करावा लागत आहे .

भारताचा महसुली आणि भांडवली खर्च , आकडे कोटी रु.मध्ये. (कंसातील आकडे शेकडा % प्रमाण )

| क्र. | वर्ष | महसुली खर्च | भांडवली खर्च | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | १९७०-७१ | ३१३० (५५.६५) | २४९४ (४३.२५) | ५६२४ (१००) |
| २ | १९८०-८१ | १४४१० (६३.२९) | ८३५८ (३६.७१) | २२७६८ (१००) |
| ३ | १९९०-९१ | ७३५१६ (६९.८२) | ३१७८२ (३०.१७) | १०५२९८ (१००) |
| ४ | २०००-०१ | २७७८३९ (८५.३३) | ४७७५३ (१४.६७) | ३२५५९२ (१००) |
| ५ | २०१०-११ | १०४०७२३ (८६.९२) | १५६६०५ (१३.०८) | ११९७३२८ (१००) |
| ६ | २०१९-२० | २३४९६४५ (८७.०७) | ३४८९०७ (१२.९३) | २६९८५५२ (१००) |

संदर्भ - htpp://dbei.rbi.org.in /DBIE/dbie.rbi?site=publication

वरील आकडेवारीवरून भारत सरकारच्या महसुली आणि भांडवली खर्चात वाढ होताना दिसून येत आहे .१९७०-७१ मध्ये एकूण खर्चापैकी महसुली खर्च ५५.६५ % होता आणि भांडवली खर्च ४४.३५% इतका होता . महसुली खर्चात वाढ होत आहे २०००-०१ मध्ये ८६.९२ तर २०१९-२० मध्ये ८७.०७ पर्यंत वाढलेले दिसून येते. भांडवली खर्चात सातत्याने घट होत असल्याचे दिसून येते.२०१९-२० मध्ये केवळ १२.९३ एवढाच भांडवली खर्च सरकारकडून करण्यात आलेला आहे.वरील तक्त्यात कंसातील आकडे महसुली आणि भांडवली खर्चाचे एकूण खर्चाशी असणारे प्रमाण% दर्शविते .

भारतात १९८० च्या दशकात विकासेत्तर खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्यामुळे सरकारची वित्तीय तुट मोठ्या प्रमाणावर वाढली परिणामी १९९० मध्ये भारतात वित्तीय संकट निर्माण झाले .सार्वजनिक खर्च करत असताना काही मूलतत्त्वे पाळली जावीत, असे सुचवले जाते. यामध्ये सार्वजनिक खर्चास रीतसर मान्यता घेणे (उदा., संसदेची मान्यता), खर्च काटकसरीने केला जावा, खर्चातून काही निश्चित असा लाभ प्राप्त व्हावा व खर्च शक्यतो उत्पन्नातून असावा (म्हणजे तुटीच्या व्यवहारातून खर्च असू नये), अशी प्रमुख मूलतत्त्वे सांगितली जातात. ही मूलतत्त्वे किंवा खर्चातील कसोटयांचे तंतोतंत पालन होतेच असे नाही. भारतात मोठया प्रमाणावरील सार्वजनिक खर्च करताना तुटीच्या अर्थभरणा करावा लागतो.

**निष्कर्ष-**

१) सनातन पंथीयांच्या मते सरकारने कमीत कमी कार्ये करावीत.अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करू नये.
२)केन्सच्या मते अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित करण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करावा.
३)कल्याणकारी राज्य संकल्पनेचा भारताने स्वीकार केल्यामुळे सरकारच्या कार्यात वाढ झालेली आहे.
४)विकासात्मक कार्यामुळे लोकांच्या रोजगारात ,उत्पन्नात पर्यायाने राहणीमानात वाढ झालेली आहे.
५)सरकारच्या महसुली व भांडवली खर्चात वाढ झालेली आहे.
६)वाढत्या सार्वजनिक खर्चामुळे अर्थव्यवस्थेचा विकास होत आहे .

**संदर्भ सूची -**

१) सार्वजनिक अर्थशास्त्र -प्रा. नामदेव डोके -विकास पब्लिशिंग हाउस
२)राजस्व -प्रा.सु .रा. ओझरकर , विद्या प्रकाशन
३)सार्वजनिक आयव्यायचे अर्थशास्त्र -प्रो.डॉ.एन.एल.चव्हाण..डॉ.एम.जे.गायकवाड ,प्रशांत पब्लिकेशन्स
४)सार्वजनिक वित्त -डॉ.सुदामा सिंह ,डॉ.राजीव कृष्ण सिंह -राधा पब्लिकेशन्स
५) सार्वजनिक आयव्यय, डॉ.नीता वाणी ,प्रशांत पब्लिकेशन्स
६)सार्वजनिक आयव्यय,डॉ.एस.व्ही.ढमढेरे ,डॉ.अक्षय काळे ,डॉ.दत्तात्रय चव्हाण ,डायमंड पब्लिकेशन्स
७) htpp://dbei.rbi.org.in /DBIE/dbie.rbi?site=publication



Scanned with OKEN Scanner
Scanned with CamScanner